# कुलाबा ते सीप्झ मेट्रोचे काम सुसाट

## छायाचित्र प्रदर्शनातून उलगडला प्रवास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. लवकरात लवकर संपूर्ण मुंबईत आणि उपनगरात मेट्रोने सुखकर प्रवास करता यावा, यासाठी धडपड सुरू आहे. कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचे एकूण ७९.८ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून, यातील पहिला टप्पा आरे ते बीकेसीचे ८५.२ टक्के तर दुसरा टप्पा बीकेसी ते कफ परेडचे ७६ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. मुंबई मेट्रो मार्ग-३ च्या १५ दिवसांच्या छायाचित्र प्रदर्शनासह नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिग आर्ट्स (एनसीपीए) ने नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाच्या बांधकामादरम्यानची चित्त थरारक दृश्य छायाचित्राच्या माध्यमातून पाहण्याची तसेच अभियांत्रिकी आविष्कार व प्रकल्पाची जटिलता समजून घेण्याची ही एक सुवर्णसंधी यानिमित्ताने मुंबईकरांसाठी आली आहे. दरम्यान, मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाचे एकूण ७९.८ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून, यातील एनसीपीएच्या नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीत मुंबई मेट्रो मार्ग-३, मुंबई सागरी मार्ग आणि मुंबई पार बंदर प्रकल्पासारख्या शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या निर्मितीची अनुभूती या छायाचित्र प्रदर्शनातून अनुभवता येणार आहे. यासाठी छायाचित्र प्रदर्शनाच्या ३ भागांची मालिका आयोजित करण्यात आली असून, मेट्रो मार्ग-३ च्या छायाचित्र प्रदर्शनापासून या उपक्रमाला सुरुवात होत आहे. मेट्रो-३ वरील हे प्रदर्शन मुंबईकरांना ३ मार्च ते १६ मार्चदरम्यान दुपारी १२ ते ८ या वेळेत पाहता येणार आहे.

### १७ टनेलचे बोरिंग मशीनने काम

- कुलाबा - वांद्रे - सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो मार्ग ३ च्या भुयारीकरणाच्या कामासाठी तब्बल १७ टनेलचे बोरिंग मशीनने एकत्र काम केले आहे.
- देशात पहिल्यांदाच असे घडले असून, टनेल बोरिंग मशीनच्या कामामुळे मेट्रोच्या ३ ने १०० टक्के भुयारीकरणाने पूर्ण केले आहे.
- मेट्रो ३ चा हा मार्ग ३३ किलोमीटरचा लांब असून, या मार्गातील सर्व भुयारीकरण टनेल बोरिंग मशीनच्यावतीने पूर्ण करण्यात आले आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने सांगण्यात आले.
- या संपूर्ण बांधकामाचा प्रवास छायाचित्रांतून उलगडण्यात आला आहे. हा थरारक अनुभव मुंबईकरांना घेता येणार आहे.